
पान खुणेचे

# डॉ. आंबेडकरांची मर्मभेदी भाषणे

**केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव गेल्या अनेक वर्षांपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा, जीवनकार्याचा अभ्यास करीत आहे. डॉ. आंबेडकरांच्या ५०० ऐतिहासिक भाषणांचे संपादन व संकलन डॉ. जाधव यांनी तीन खंडामध्ये केले आहे. या पुस्तकात डॉ. जाधव यांनी मांडलेल्या भूमिकेचा काही भाग**




महामानव डॉ. आंबेडकरांच्या विद्वत्तेचा, त्यांच्या प्रकांड पांडित्याचा वारसा व्यक्त झालेला आहे त्यांच्या मूलग्राही लिखाणातून आणि मर्मभेदी भाषणांतून. त्यांचे चिंतन, त्यांच्या विचारांची दिशा, दृष्टिकोन, ध्येयधोरणे आणि विविध समस्या हाताळण्यासाठी त्यांनी केलेली व्यूहरचना या साऱ्या गोष्टी प्रतीत होतात त्या त्यांच्या ओजस्वी भाषणांतून. म्हणूनच या महामानवाचे जीवितकार्य समजून घेताना त्यांनी वेळोवेळी केलेल्या भाषणांचा अभ्यास करणे अगत्याचे ठरते. व्यक्ती मर्त्य असते; पण विचार कधीही मरत नाहीत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार गेल्या कित्येक वर्षांपासून एका पिढीतून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होत आहेत. अखंड ज्ञानसाधना हेच बाबासाहेबांचे जीवितकार्य होते. त्यांच्या या विचारांचा वारसा पुढे चालविणे हेच त्यांच्या कोट्यवधी अनुयायांचे आनंदनिधान आहे. ही ग्रंथत्रयी साकारताना, इंग्रजी आणि मराठीत उपलब्ध असलेल्या या सर्व भाषणांची पहिल्यांदाच तयार करण्यात आलेली समग्र भाषणांची सूची या ग्रंथत्रयीच्या पहिल्या खंडात सादर करण्यात आली आहे. या ५०० भाषणांपैकी मूळ २३६ भाषणे फक्त मराठीत, १०२ भाषणे केवळ इंग्रजीत तर ११२ भाषणे मराठी व इंग्रजी अशा दान्ही भाषांमध्ये उपलब्ध झाली. त्यापैकी केवळ इंग्रजीत उपलब्ध असलेल्या १०२ भाषणांचा मराठी अनुवाद करून, ही सारी ५०० भाषणे प्रस्तुत ग्रंथाच्या तीन ग्रंथांमध्ये सपांदित करण्यात आली आहेत.

**विषयवार वर्गीकरण**

प्रज्ञासूर्य डॉ. आंबेडकरांच्या भाषणातील विषय आणि विचार वैविध्य लक्षात घेऊन या ५०० भाषणांचे सात वेगवेगळ्या गटांमध्ये वर्गीकरण करता येते, ते पुढीलप्रमाणेः आत्मनिवेदनपर, सामाजिक भाष्य (अस्पृश्यता व जाती व्यवस्था, लोकशाही, शिक्षण व इतर), राजकीय भाष्य,अर्थकारण (अर्थतज्ज्ञ व अर्थप्रशासन), कायदा व संविधान (कायदा-प्रशासन, राज्यघटना निर्मिती), धर्मकारण भाष्य, अनुयायी प्रबोधन (सर्वसाधारण, युवाशक्ती, महिला आणि निधी संकलन).

**वक्तादशसहस्त्रेषू**

बाबासाहेबांच्या ओजस वाणीतून प्रकटलेला प्रत्येक बोल-शब्दनशब्द- क्रांतिकारी आहे. लौकिकदृष्ट्या डॉ. आंबेडकरांच्या भाषणाच्या शैलीची वेगवेगळी वैशिष्ट्ये सांगता येतील. मराठी, इंग्रजी, हिंदी, गुजराती अशा चार भाषा त्यांना अवगत होत्या (जर्मन आणि फ्रेंच भाषा शिकण्याचादेखील त्यांनी प्रयत्न केला होता). इंग्रजी आणि मराठी भाषांवर डॉ. आंबेडकरांचे असामान्य प्रभुत्व होते. त्यांच्या इंग्रजी भाषेत तर्कशुद्ध धारदारपणा तर आहेच परंतु अफाट व्यासंगातून आलेली व्यापकतादेखील आहे. प्रमाण मराठी भाषेवर आणि बोलीभाषेतील मराठीवर तर त्यांची पकड विलक्षण म्हणावी अशा स्वरूपाची आहे. आपले विद्वत्तापूर्ण विचार अगदी तर्कशुद्ध आणि तरीही मराठीचा रसाळ गोडवा कायम मांडणारा असा वक्ता पुन्हा होणे नाही. संस्कृत शिकता आली नाही याची खंत बाबासाहेबांनी कधीकाळी व्यक्त केली असली तरी त्यांच्या भाषणांमध्ये संस्कृत भाषेतील अनेक सुभाषितांचा समावेश असे. पाल्हाळीक भाषेपेक्षा, मोजक्याच शब्दांत समुदायाला मंत्रमुग्ध करून कार्यप्रवण करण्याचे जे सामर्थ्य फारच कमी नेत्यांना लाभते, ते बाबासाहेबांना लाभले होते. तेजोनिधी बाबासाहेबांच्या कार्यकर्तृत्वामुळे त्यांच्या विरोधातील काही नेत्यांनी त्यांच्यावर कठोर शब्दांत टीका केली होती. त्याला तितक्याच किंबहुना अधिक कठोर शब्दांत बाबासाहेबांनी प्रत्युत्तर दिले होते. कित्येकदा आपल्यावर झालेल्या टीकेला नर्मविनोदी शैलीत उत्तर देऊन त्यांनी वातावरणातला ताण सहजरित्या दूर केलेला दिसतो. बाबासाहेबांना भजी फार आवडत असत. त्यामुळे त्यांच्यावर ते एका बैठकीत दोन शेर भजी खातात म्हणून टीका केली होती. आता या टीकेला त्यांच्या लेखी कितीसे महत्त्व असणार.? तरीही त्यांनी या टीकेचाच वापर करून भाषणात हशा पिकविला. ते म्हणतात '...आता दोन शेर भजी खाल्ल्याने माझ्या नैतिकतेवर काही विपरित परिणाम होणार आहे काय?' बाबासाहेब आंबेडकरांनी वक्तृत्व स्पर्धेच्या पारितोषिक वितरणात केलेली भाषणे म्हणजे उत्तम वाक्‌कलेचा उत्तम नमुना आहे. बाबासाहेब आंबेडकर काहीवेळा स्वतःचे भाषण १३-१३ वेळा लिहून काढत असत. भरपूर व सकस वाचन हे बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रभावी भाषणाचे व भाषाशैलीचे पुरेसे बोलके वैशिष्ट्य आहे.

**प्रस्तुत ग्रंथाची रचना व मांडणी**

प्रस्तुत तीन खंडांमध्ये सुमारे ५०० भाषणे संपादित करण्यात आली आहेत. यापैकी पहिल्या खंडातील भाषणे मुख्यतः आत्मनिवेदनपर व अनुयायी प्रबोधनाच्या उद्देशाने केलेली भाषणे आहेत. प्रत्येक पुस्तकाच्या प्रारंभीच सूची देण्यात आली आहे. या भाषणांची विभागणी अस्पृश्यता व जाती व्यवस्था, युवकांना मार्गदर्शन, महिलावर्गाचे प्रबोधन व निधी संकलनाचे आवाहन, अशा चार उपगटांमध्ये करण्यात आली आहे.

दुसऱ्या खंडामध्ये बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि कायदा व संविधानविषयक भाषणे विभागवार समाविष्ट करण्यात आली आहेत. सामाजिक भाषणांमध्ये पुन्हा चार उप-गट करण्यात आले आहेत. त्याची संरचना अस्पृश्यता व जाती व्यवस्था, लोकशाही, शिक्षण व संकीर्ण अशी आहे. आर्थिक भाषणांमध्ये बाबासाहेबांनी अर्थतज्ज्ञ व अर्थप्रशासकाच्या भूमिकेतून केलेली भाषणे असे दोन उपगट आहे. कायदा व संविधानविषयक भाषणांमध्ये कायदा, संविधान व संकीर्ण असे उपगट आहेत.

तिसऱ्या व अंतिम खंडात बाबासाहेबांच्या राजकीय भाषणांचा समावेश आहे. यामध्ये बाबासाहेबांनी जीवनाच्या विविध टप्प्यांवर केलेल्या राजकीय भाषणांचा समावेश आहे. बाबासाहेबांच्या जीवनातील हे टप्पे कालानुक्रमे आहेत. अंतरिम पदार्पण, प्रांतीय पातळीवर पदार्पण, राष्ट्रीय पातळीवर झेप, प्रांतिक राजकारण, ब्रिटिश सरकारचे श्रममंत्री, राजकीय अस्थिरता व अस्वस्थता, कायदामंत्री व संविधान-निर्मिती व अंतिम पर्व अशा नऊ टप्प्यांमध्ये ही भाषणे समाविष्ट करण्यात आली आहेत.

महाराष्ट्र टाईम्स २४ ऑक्टोबर २०१२

लोकिकदृष्ट्या डॉ. आंबेडकरांच्या भाषणाच्या शैलीची वेगवेगळी वैशिष्ट्ये सांगता येतील. अनुयायी प्रबोधन करताना कधी मातृहृदयी ममता, तर कधी पितृतुल्य दिशादर्शन करणारे डॉ. आंबेडकर तुमच्या-आमच्यासाठी बाबासाहेब कसे झाले हे उमगते. स्वतःवरील सामंजस्यपूर्ण टीकेला कधी खिलाडूवृत्तीने घेणारे बाबासाहेब, कधी-कधी विरोधकांना एखाद्या मल्लासारखे आव्हान देताना दिसतात.

मराठी, इंग्रजी, हिंदी, गुजराती भाषा त्यांना अवगत होत्या (जर्मन आणि फ्रेंच भाषा शिकण्याचादेखील त्यांनी प्रयत्न केला होता). इंग्रजी आणि मराठी भाषांवर डॉ. आंबेडकरांचे असामान्य प्रभुत्व होते. त्यांच्या इंग्रजी भाषेत तर्कशुद्ध धारदारपणा तर होताच, शिवाय अफाट व्यासंगातून आलेली व्यापकता आणि प्रगल्भताही होती. प्रमाण मराठी भाषेवर आणि बोलीभाषेतील मराठीवर तर त्यांची पकड विलक्षण म्हणावी अशा स्वरूपाची दिसते. आपले विद्वत्तापूर्ण विचार अगदी तर्कशुद्ध आणि तरीही मराठीचा रसाळ गोडवा ठेवून मांडणारा असा वक्ता पुन्हा होणे नाही.

# विद्वत्तापूर्ण आणि रसाळ विचारधन

**महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ५३७ उपलब्ध भाषणांपैकी ५०० भाषणे 'बोल महामानवाचे' या शीर्षकाच्या आगामी ग्रंथत्रिवेणीत समाविष्ट करण्यात आली आहेत. प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांनी या त्रिखंडीय ग्रंथाच्या प्रारंभी घेतलेल्या चिकित्सक आढाव्याचा हा अंश . या ग्रंथांचे प्रकाशन २५ ऑक्टोबरला नागपुरात होत आहे.**


तेजोनिधी बाबासाहेबांच्या कार्यकर्तृत्वामुळे त्यांच्या विरोधातील काही नेत्यांनी त्यांच्यावर कठोर शब्दांत टीका केली होती. त्याला तितक्याच किंबहुना अधिक कठोर शब्दांत बाबासाहेबांनी प्रत्युत्तर दिले होते. 'कुठे मी हिमालय व कुठे हे मुतखडे...', असे संबोधून बाबासाहेबांनी विरोधकांना पळता भुई थोडी केली होती. कित्येकदा आपल्यावर झालेल्या टीकेला नर्मविनोदी शैलीत उत्तर देऊन त्यांनी वातावरणातला ताण सहजगत्या दूर केलेला दिसतो. बाबासाहेबांना भजी फार आवडत असत. त्यामुळे त्यांच्यावर ते एका बैठकीत दोन शेर भजी खातात अशी टीका केली गेली होती. आता या टीकेला त्यांच्या लेखी कितीसे महत्त्व असणार? तरीही त्यांनी या टीकेचाच वापर करून भाषणात हशा पिकवला. ते म्हणतात '...आता दोन शेर भजी खाल्ल्याने माझ्या नैतिकतेवर काही विपरीत परिणाम होणार आहे काय?' बाबासाहेबांच्या भाषाशैलीला नर्म विनोदाची झालर असली तरी त्यामागे सामाजिक विषण्णतादेखील दडलेली होती.

गंभीर विषयाची मांडणी करताना बाबासाहेब श्रोत्यांच्या सहज आकलनासाठी रोजच्या जगण्यातील उदाहरणे देत असत. अस्पृश्यता नष्ट करणे म्हणजे विषाचे अमृत करता येण्यासारखे आहे. हिंदू धर्मात राहून ते अजिबात शक्य नाही, असे प्रतिपादन करताना बाबासाहेब आंबेडकरांनी स्वयंपाकघरातील उदाहरण दिले आहे. तेही स्वतःच्या पाककलेचे कौशल्य अधोरेखित करत. ते म्हणतात, '...विषाचे अमृत होणेच शक्य नाही. पदार्थ खारट झाला तर तो अळणी करता येईल, आंबट झाला तर तो गोड करता येईल, पण विषाचे अमृत करता येणे अशक्य आहे. मी स्वतः स्वयंपाक करण्यास शिकलो आहे. मला कोणाही भगिनीइतका चांगला स्वयंपाक करता येतो. तुम्हाला कदाचित माहीत नसेल, पण काही धंदा न मिळाल्यास बावर्ची तरी होता यावे म्हणून मी स्वयंपाक करण्याचे काम शिकलो आहे. एखादा पदार्थ खारट झाला तर त्यातले मीठ कसे काढावे हे ज्या भगिनींना माहीत नसेल, त्यांना मी त्याची युक्ती सांगून ठेवतो. खारट पदार्थ शिजत असताना त्यात एक कागदाचा तुकडा टाकून ठेवावा, म्हणजे तो पदार्थ अळणी होतो. सांगण्याचे तात्पर्य इतकेच, की सर्व काही बदलता येईल, पण विषाचे अमृत होणार नाही.'

बाबासाहेबांना हिंदू धर्माचा तिटकारा होता. पण हिंदू धर्माचे तत्त्वज्ञान ज्या भाषेत उपलब्ध आहे, त्या संस्कृत भाषेविषयी त्यांना जिव्हाळा, प्रेम होते. कदाचित ती भाषा शिकू न शकल्याची खंतही असेल; पण बाबासाहेब अनेकदा संस्कृतमधील सुभाषिते प्रसंगानुरूप, कालानुरूप उद्धृत करत असत. एके ठिकाणी तर हिंदू धर्माची व्याख्या मांडताना त्यांनी वि. दा. सावरकर व लोकमान्य टिळक यांनी यासंदर्भात वापरलेली सुभाषिते उद्धृत केली. ती सुभाषिते मांडताना हिंदू धर्मातील दोष तर बाबासाहेबांनी दाखवून दिलेच, पण त्याबरोबरच बौद्ध धम्माचा विचारदेखील श्रोत्यांवर बिंबवला. येथे एक गोष्ट आवर्जून नमूद केली पाहिजे ती म्हणजे, गीता तत्त्वज्ञान धर्मग्रंथ म्हणून बाबासाहेबांना कधीही फारसा आश्वासक वाटला नाही. पण त्यातील काही काही सुभाषिते कालसुसंगत असल्याने बाबासाहेब त्यांचा संदर्भ देत असत.

एकीकडे मोठमोठाले संदर्भ देताना बाबासाहेब आपल्या भाषणांमध्ये सामान्यांना जवळच्या वाटणाऱ्या म्हणींचाही वापर करत. वानगीदाखल, धर्मतत्त्वाचे वर्णन करताना बाबासाहेबांनी एका म्हणीचा वापर केला आहे, 'की पीछेसे आगे चलाई' म्हणजे जे परंपरेने चालत आले आहे तेच पुढे ढकलावे. याशिवाय, साम्राज्याच्या गरजा येती कामाच्या काजा, नेति-नेति (नन्नाचा पाढा), हिंदू धर्मातील आंधळेपणाचे वर्णन करताना कायदा ईश्वरप्रणित आहे हा समज, उंदरांची मदत केवळ उसनवारीची असते, दिधले दुःख पराने उसने-फेडू नयेचि सोसावे, जो दुसऱ्यावरी विसंबला, त्याचा कार्यभाग आटोपला, थेंबे थेंबे तळे साचे, मन स्वतंत्र तर मनुष्य स्वतंत्र, हिरा पडा बाट में कोई अंधा निकल जाय, नेसेन तर जरीची साडी, नाहीतर उघडीच बसेन, जव्याचा जाय बुरसा; मग तो सहजच होय आरसा... यासारख्या म्हणी वापरून बाबासाहेब आपल्या ओघवत्या शैलीने श्रोत्यांना आपलेसे करत.

बाबासाहेबांनी हिंदू धर्मावर, धर्मग्रंथांवर अनेक आघात केले. परंतु धर्मातील दोष दाखवणाऱ्या परंतु हिंदू धर्माच्याच संरचनेचा एक भाग असलेल्या काही ग्रंथांमधील कवने बाबासाहेबांनी अनेकदा भाषणांमध्ये वापरली आहेत. जशी की- दया तिचे नाव, भूतांचे पाळण। आणिक निर्दाळन कंटकांचे।। विशेषतः बाबासाहेब आंबेडकरांनी जगतगुरू संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या क्रांतिकारी अभंगांचा अनेकदा दाखला दिला आहे. एखाद्या कीर्तनकाराप्रमाणे दृष्टांत देताना अनुरूप कथांचा वापरही बाबासाहेबांच्या भाषणांमध्ये आढळतो. जसजसा बाबासाहेब आंबेडकरांचा प्रवास बोधिसत्त्वाच्या मार्गावरून सुरू झाला तसतशा जातक कथाही बाबासाहेबांच्या भाषणात येऊ लागल्या. मिलिंदच्या कथा, भगवान गौतम बुद्धाच्या कथा सांगून बाबासाहेब व्यापक अर्थाने बौद्ध धर्माचे प्रवचनकारच झाले. बाबासाहेबांच्या प्रासादिक वाणीमुळेच त्यांचा प्रत्येक शब्द त्यांच्या




कोट्यवधी अनुयायांना कार्यप्रवण करणारा ठरला.

एक मात्र नक्की, बाबासाहेबांनी भाषणांमध्ये कधीही व्यक्तिगत आकस व्यक्त केला नाही. त्या काळी सर्वमान्य असलेल्या सामाजिक नेत्यांवर बाबासाहेबांनी जोरदार टीका केली आहे. भारताने ज्यांना महात्मापण बहाल केले, त्या गांधीजींवरदेखील बाबासाहेबांनी वेळोवेळी टीका केल्याचे आढळते. परंतु ही टीका वैयक्तिक स्वरूपाची नव्हती. तत्त्वांशी असलेले मतभेद त्याच भाषेत बाबासाहेबांनी व्यक्त केले. त्यामुळे एखाद्या व्यक्तीशी त्यांचे मतभेद होते असे म्हणता येईल; पण वैर होते असे कदापि म्हणता येणार नाही. त्यामुळे एखाद्या नेत्यासमवेतचे त्यांचे वैचारिक मतभेद वैयक्तिक वैर म्हणून रंगवणाऱ्यांनी बाबासाहेबांची भाषणे नव्याने अभ्यासण्याची आवश्यकता आहे.

ही ५०० भाषणे वाचल्यानंतर वाचकांना डॉ. आंबेडकरांची केवळ वैचारिक उत्क्रांतीच नव्हे तर त्यांच्या जीवनाची विकसित होत गेलेली दिशाही समजून घेण्यास मदत होईल.